| MHJN070011712022 | **नियमित दिवाणी दावा नं. १३६/२०२२**<br>**नि. क्र. ३३ खालील आदेश**<br>रामा उर्फ रामभाऊ भिका हिवाळे वि.<br>सर्वेराव देवराव हिवाळे व इतर |
|---|---|

सदरचा अर्ज प्रतिवादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे लेखी म्हणणे यात दुरुस्ती करण्याकरीता दाखल केला आहे.

२. प्रतिवादी यांचे कथन असे की, प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी यांनी सादर केलेल्या लेखी म्हणणेमध्ये परिच्छेद क्र.८ च्या शेवटी असा मजकुर समाविष्ट करायचा आहे की "सर्वे नं.९४/४ मध्ये रामा भिका, तान्हाबाई भ्र तुकाराम आणि म्हाळसाबाई जयराम यांची नावे दिसतात. तसेच तान्हाबाई तुकाराम वाकोडे मयत असून व म्हाळसाबाई भ्र जयराम हिवाळे मयत आहे. यांना सुध्दा वादीने दाव्यात पार्टी केले नाही. तसेच मयताच्या वारसांचा वादी म्हणून समावेश नाही. तसेच संपूर्ण कुटुंबास १४५ एकर जमीन होती त्यापैकी शिवाराम मुंकीदा हिवाळे यांना ४१ एकर वारसासहित कायदेशीर वाटण्या नाही, वाटणीपत्रक नाही, मोघम जमीन ७/१२ उता-यात आहे. तसेच जयराम मुंकिदा हिवाळे यांना वारसासहित ४८ एकर २३ आर जमिन आहे. जिची विना कायदेशीर वाटण्या झालेले व ७/१२ उता-यात आहे. तसेच सखाराम मुकिंदा हिवाळे यांना वारसासहित ५० एकर जमीन विना कायदेशीर वाटण्या झालेल्या ७/१२ उता-यात दिसत आहे. मुर्कींदा राणू हिवाळे यांची वंशावळ जी अर्जात दिली आहे तसा मजकुर समाविष्ट करायचा आहे. सदर मजकुर लेखी म्हणणे मध्ये समाविष्ट केल्यास लेखी म्हणणेच्या मुळ संरचनेत कोणताही बदल होणार नाही. करीता परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. वादी यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे दाखल केले आहे. वादी यांनी असे कथन केले की उपरोक्त प्रकरण वादी यांनी शाश्वत मनाई हुकुम मिळणेसाठी दाखल केलेले आहे, वाटण्या होण्यासाठी नाही. त्यामुळे या ठिकाणी वंशावळ देण्याची कोणतीच आवश्यकता नाही. सदर दावा वादीचा असून संपुर्ण बर्डन हे वादीवर आहे. अजून दाव्याचे इश्यु फ्रेम झालेले नाही. सदर दाव्यामध्ये नि.क्र.५ वर दोन्ही पक्षाचे युक्तीवाद होउन

नि.क्र.५ वरील आदेशासाठी प्रकरण आहे. सदर प्रकरण हे सन २०२२ चे असून प्रतिवादी यांनी प्रकरण लांबणीवर टाकण्यासाठी व नि.क्र.५ वरील आदेशास विलंब व्हावा या हेतुने सदरचा अर्ज दिलेला आहे. प्रतिवादी यांना तारीख वाढवण्याबाबत दि.१४/०८/२०२३ रोजी २००/- रु., दि.०९/११/२०२३ रोजी ३००/- रु. व दि.१५/०४/२०२४ रोजी २००/- रु. या प्रमाणे दंड झालेला आहे. सदर रक्कम प्रतिवादी यांनी वादींना दिलेली नाही. अशा प्रकारे फक्त प्रकरण लांबणीवर टाकण्यासाठी सदर अर्ज प्रतिवादीतर्फे देण्यात आलेला आहे. त्यामुळे नि.क्र.५ वर आदेशास विलंब होत असून वादीवर अन्याय होत आहे. तसेच प्रतिवादींनी दुरुस्तीबाबत दाखल केलेली वंशावळ देखील चुकीची आहे. त्यामुळे सदर अर्ज नामंजूर करण्यात यावा व नुकसान भरपाई म्हणुन ५०००/- रु. वादीस देण्याचा आदेश करण्यात यावा.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. सदरचा दावा हा शाश्वत मनाई हुकुम मिळणेकरीता केलेला आहे. सदर दाव्यात प्रतिवादी यांनी नि.२२ अन्वये लेखी जबाब दाखल केला असून प्रतिवादी लेखी जबाबमध्ये दुरुस्ती करुन मागत आहे. सदरचा अर्ज मंजूर केल्याने वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही व दाव्याच्या स्वरुपात देखील बदल होणार नाही. सदरची दुरुस्ती ही दाव्याच्या योग्य त्या अंतिम निर्णयासाठी आवश्यक आहे. सबब, न्यायाच्या हितामध्ये पुढील आदेश पारित करण्यात येतो.

## **आ दे श**

१. अर्ज निशाणी ३३ हा मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांना आदेशीत करण्यात येते की सदर अर्जात नमूद दुरुस्ती ही पुढील तारखेच्या आधी अथवा १४ दिवसांच्या आत करुन दुरुस्ती प्रत न्यायालयात हजर करावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

Digitally signed by GADE APARNA DAYANAND
Date: 2024.08.07 14:55:30 +0530

दिनांकः– ०७/०८/२०२४.

(अपर्णा डी. गाडे )
दिवाणी न्यायाधीश (क. स्तर ),
जाफ्राबाद.

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द नि शब्द मुळ आदेशा प्रमाणे आहे.

स्वाक्षरित/–

दिनांक ०७/०८/२०२४

(अहेमद आय.शेख)

*लघुलेखक.*